दिनांक:- २२/०५/२०१८
चंदननगर पो.स्टे. पुणे शहर

## प्रेस नोट

**सराईत मोबाईल चोरास चंदननगर पोलीसांनी जेरबंद करुन त्यांचेकडुन ३६ मोबाईल जप्त केलेबाबत**

चंदननगर पोलीस स्टेशन हददीमध्ये पेइंग गेस्ट (पीजी) मधुन पहाटेवेळी मोबाईल चोरी प्रतिबंध करणे करीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मुळीक यांनी तपास पथक टिमची गस्त नेमण्यात आली असुन दि. २२/०५/२०१८ रोजी पहाटेचे वेळी चंदननगर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी मिळालेले बातमीचे आधारे मोबाईल चोर आरोपीत नामे श्रीनिवासकुमार व्यंकटेशकुमार वय-२२ वर्षे रा. कदमवस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली जि. पुणे मुळगाव- अंबुर रा. तमिळनाडु यास आज दि. २२/०५/२०१८ रोजी ताब्यात घेऊन त्यांचे कडुन एकुण **३,०२,०००/- रु. (तीन लाख दोन हजार किंमतीचे) मोबाईल त्यामध्ये सॅमसंग, ओप्पो, मोटोरोला, ॲप्पल, विवो, रेडमी, मायक्रोमॅक्स, लिनोव्हा, लावा इत्यादी कंपनीचे एकुण ३६ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत**. वरील मोबाईल नंबरचे आय.एम.ई.आय. नंबर वरुन पुढील तपास चालु आहे. सदरचा आरोपीतास मा. न्यायालयाने दि.२४/०५/२०१८ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त श्री, दिपक साकोरे, सहायक पोलीस आयुक्त, श्री. गणेश गावडे यांचे मार्गदर्शनाखाली चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मुळीक, पोलीस उप निरीक्षक संदीप साळुंखे, पोलीस उप निरीक्षक श्रीधर भोसले, पोलीस उप निरीक्षक विठ्ठल झाजुर्णे, पोलीस उप निरीक्षक जयेश खलाणे, पो हवा श्रीकांत गांगुर्डे, पोलीस नाईक तुषार खराडे, तुषार भिवरकर, प्रदिप सोनवणे, अमित जाधव, राहुल सोनकांबळे यांनी केलेली आहे. आरोपीताकडे सखोल तपास करुन पुढील कारवाई करीत आहोत.